दैनिक
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक ३०६ । गुरूवार २० ऑगस्ट २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

# चिमुकलीची अत्याचारानंतर हत्या



## जुन्नर हादरले; संशयित शेजारी ताब्यात!

### पोलिस अधीक्षक घटनास्थळी दाखल, फॉरेन्सिक पथकाकडून तपास

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे** : जुन्नर तालुक्यातील पिंपळवंडी येथे साडेनऊ वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या झाल्याची संतापजनक घटना मंगळवारी दुपारी उघडकीस आली. घराशेजारी राहणाऱ्या एका तरुणाने ओळखीचा गैरफायदा घेत मुलीला सायकलवरून शेताच्या परिसरात नेल्याचा प्राथमिक तपास पोलिसांनी सुरू केला असून, या प्रकरणातील संशयित तरुणाला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या घटनेने संपूर्ण जुन्नर तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे.

मुलगी बेपत्ता झाल्यानंतर कुटुंबीयांनी पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानंतर पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली असता शेत परिसरात तिचा मृतदेह आढळून आला. घटनास्थळी न्यायवैद्यक पथकाने पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित केले आहेत. मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेचा संपूर्ण क्रम शवविच्छेदन व न्यायवैद्यक अहवालानंतर अधिक स्पष्ट होणार आहे. पोलिसांकडून परिस्थितीजन्य तसेच तांत्रिक पुराव्यांच्या आधारे तपास सुरू आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी घटनास्थळी जाऊन तपासाचा आढावा घेतला. विविध तपास पथके या प्रकरणात कार्यरत असून, घटनास्थळावरील पुरावे, परिस्थितीजन्य पुरावे आणि इतर उपलब्ध माहितीच्या आधारे तपासाची दिशा निश्चित केली जात आहे. पोलिसांकडून घटनास्थळावरील पुरावे, न्यायवैद्यक अहवाल, उपलब्ध तांत्रिक माहिती आणि साक्षीदारांचे जबाब यांची पडताळणी केली जात आहे. तपास पूर्ण झाल्यानंतरच गुन्ह्याची संपूर्ण पार्श्वभूमी आणि आरोपीविरुद्धचे ठोस पुरावे स्पष्ट होतील. पुणे ग्रामीण पोलिसांच्या महिला व बाल सहाय्य यंत्रणेकडूनही अशा प्रकरणांत कायदेशीर कार्यवाही व पीडित कुटुंबाला आवश्यक सहाय्य केले जाते.

#### आमदार शरद सोनवणे यांच्या गावातच घटना

पिंपळवंडी हे जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांच्या मूळ गावाशी संबंधित असल्याने या घटनेने स्थानिक पातळीवरही राजकीय व सामाजिक संताप व्यक्त होत आहे. मात्र, तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला दोषी ठरविण्याऐवजी पोलिस तपास आणि न्यायालयीन प्रक्रियेला महत्त्व देणे आवश्यक आहे.

**ग्रामस्थांचा संताप**

घटनेची माहिती समोर येताच पिंपळवंडी परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले. निष्पाप चिमुकलीवर अत्याचार करून तिचा जीव घेणाऱ्याला कायद्यानुसार कठोरात कठोर शिक्षा व्हावी, तपास जलदगतीने पूर्ण करून दोषींना न्यायालयासमोर उभे करावे, अशी मागणी ग्रामस्थ आणि नातेवाईकांकडून होत आहे. पोलिसांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता पुराव्यांच्या आधारे तपास पूर्ण करावा आणि दोषी व्यक्तीला कायद्याच्या चौकटीत कठोर शिक्षा मिळवून द्यावी, अशी भावना परिसरातून व्यक्त होत आहे.

#### संशयितच शोधमोहीमेत सहभागी

तपासादरम्यान संशयित तरुणानेच मुलीला शेताकडे नेल्याचा संशय पोलिसांना आला. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, घटना घडल्यानंतर तो पोलिसांसोबत मुलीचा शोध घेण्याच्या हालचालींमध्ये सहभागी झाल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी उपलब्ध माहिती, घटनास्थळावरील पुरावे आणि इतर तपासाच्या आधारे त्याला ताब्यात घेतले. या बाबींची अधिकृत तपासणी अद्याप सुरू आहे.

#### सुनेत्रा पवार आक्रमक

या घटनेची उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी पुणे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून तपासाचा आढावा घेतला. प्रकरणाची पारदर्शक व सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. आरोपीला लवकरात लवकर शिक्षा मिळावी यासाठी हा खटला जलदगती न्यायालयात चालविण्याची विनंती मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. पीडित कुटुंबाच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असून, पिंपळवंडी येथे भेट देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# व्हीप झुगारला, अविश्वास ठरावाला गैरहजर सहा नगरसेवक सहा वर्षांसाठी अपात्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**कर्जतच्या नगरपंचायतीतील राजकीय बंडाळीला मोठा धक्का**

**कर्जत** : कर्जत नगरपंचायतीच्या सत्ताकारणातील राजकीय नाट्याला आता नवे वळण मिळाले आहे. उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांच्यावरील अविश्वास ठरावाच्या मतदानावेळी पक्षाचा व्हीप झुगारून अनुपस्थित राहणे सहा नगरसेवकांना चांगलेच महागात पडले आहे. अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सहाही नगरसेवकांना सहा वर्षांसाठी नगरसेवक अथवा स्थानिक प्राधिकरणाचे सदस्य राहण्यास अपात्र ठरविले आहे. या निर्णयामुळे कर्जतच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

दि. १५ जुलै रोजी उपनगराध्यक्ष संतोष मेहेत्रे यांच्यावरील अविश्वास ठरावासाठी मतदान घेण्यात आले. यावेळी गटनेते सतीश पाटील यांनी बजावलेला व्हीप धुडकावत सहा नगरसेवक मतदानासाठी अनुपस्थित राहिले. यामध्ये माजी नगराध्यक्षा रोहिणी घुले, भाऊसाहेब तोरडमल, भास्कर भैलुमे, संतोष मेहेत्रे तसेच भाजपच्या ताराबाई कुलथे आणि मोनाली तोटे यांचा समावेश होता.

या अनुपस्थितीविरोधात गटनेते सतीश पाटील यांनी महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम १९८७ मधील संबंधित तरतुदींनुसार कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. दि. १७ जुलै रोजी याबाबत प्रस्ताव दाखल करण्यात आला. त्यानंतर २२ जुलै, ३० जुलै आणि ५ ऑगस्ट रोजी सुनावण्या घेण्यात आल्या. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी १८ ऑगस्ट रोजी गटनेत्यांचा अनर्हता प्रस्ताव मंजूर केला.

साडेचार वर्षांत सत्तासंघर्षाचे अनेक अंक

कर्जत नगरपंचायतीच्या साडेचार वर्षांच्या राजकीय प्रवासात पदाधिकारी बदल आणि सत्तासंघर्षाच्या अनेक नाट्यमय घडामोडी घडल्या. तत्कालीन नगराध्यक्षा उषा राऊत यांच्याविरोधात १५ पैकी ११ नगरसेवकांनी बंडखोरी करत अविश्वास ठराव आणला. त्यानंतर या गटाने विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्यासोबत (पान ४ वर)

# २९ ऑगस्ट पासून आंतरवाली सराटीत उपोषण

**मनोज जरांगे पाटील यांची घोषणा : संजय सिरसाट यांचा आडमुठेपणा शिंदेंना नडणार**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जालना** : मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी येत्या २९ ऑगस्टपासून अंतरवाली सराटीतच सुरू करणार असल्याची माहिती दिली. मात्र प्रश्न जर निकाली नाही लागला तर उपोषण सुरु असतानाच मुंबईला देखील जाणार असल्याचा इशारा यावेळी त्यांनी दिला आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. या दोघांमुळेच उपोषणाची वेळ आल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे.



आज मनोज जरागे पाटील यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी २९ ऑगस्पासून सुरु होणारं उपोषण अंतरवाली सराटीतच होणार असल्याचं सांगितलं. यावेळी त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. त्यांच्यामुळंच उपोषणाची वेळ आली असल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला आहे. तर संजय सिरसाट यांचा आडमुठेपणा शिंदेंना नडणार असून दोघांची मिली भगत असल्याची शंका जरांगेंनी व्यक्त केली आहे. शिंदे यांच्या सांगण्यावरूनच बैठका घेण्यात आल्याचे जरांगे म्हणाले. एकनाथ शिंदे आणि संजय सिरसाट यांची मिलीभगत असून सिरसाट यांनी प्रमाणपत्र रद्द केल्याचा आरोपही जरांगे यांनी केला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि (पान ४ वर)

# 'सॉरी आई आणि आप्पा' चिठ्ठी लिहून सुरजची आत्महत्या

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : तालुक्यातील खंडाळा (भवरबेंद) येथे नीट परीक्षेची तयारी करणाऱ्या १९ वर्षीय विद्यार्थ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. सुरज सुभाष शिंदे असे मृत विद्यार्थ्याचे नाव आहे.



सुरज हा गट क्रमांक ४७३ येथील घराच्या वरच्या खोलीत नेहमी नीट परीक्षेचा अभ्यास करीत होता. त्याने आत्महत्येपूर्वी दोन ओळींची चिठ्ठी लिहून ठेवली होती. त्यात, 'सॉरी आई आणि आप्पा... नक्कीच पुढच्या जन्मी तुमच्यासाठी डॉक्टर बनेल. काळजी घ्या आणि आनंदी रहा,' असा मजकूर असल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.

गावात सप्ताह सुरू असल्याने दुपारच्या वेळी घरात कोणीही नव्हते. सप्ताहावरून घरी आल्यानंतर सुरजला फोन केला असता त्याचा फोन बंद असल्याचे आढळले. त्यानंतर कुटुंबातील एका मुलीने वरच्या खोलीत जाऊन पाहिले असता सुरज गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. तिने आरडाओरड केल्यानंतर कुटुंबीयांनी तातडीने त्याला खाली आणून वैजापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले.या घटनेची वैजापूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. याबाबतची माहिती खंडाळा गटाचे बीट जमादार विशाल पडळकर यांनी दिली. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# ग्रामसभा कामकाजावर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा अनिश्चित काळासाठी बहिष्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे दिगर येथे ग्रामसभेदरम्यान ग्रामपंचायत अधिकारी पी. एन. पाटील यांच्यावर झालेल्या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाल्याच्या घटनेच्या निषेधार्थ ग्रामपंचायत अधिकारी संघटनेने ग्रामसभांच्या कामकाजावर अनिश्चित काळासाठी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य संघटनेच्या या निर्णयाची अंमलबजावणी अहिल्यानगर जिल्ह्यातही करण्यात येणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले.

**शिवरे दिगर घटनेच्या निषेधार्थ राज्यव्यापी निर्णय**

याबाबत जिल्हा प्रशासनाला निवेदन देण्यात आले. ग्रामसभांबाबत आवश्यक सुधारणा होऊन ग्रामपंचायत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसंदर्भात स्पष्ट शासन निर्देश जारी होईपर्यंत, आयोजित तसेच आगामी ग्रामसभांमध्ये ग्रामपंचायत अधिकारी सचिव म्हणून कामकाज करणार नसल्याचा ठाम निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रामपंचायत अधिकारी हा शासन आणि नागरिकांमधील महत्त्वाचा दुवा असून जन्म-मृत्यू नोंदणी, विविध दाखले व अभिलेख, निवडणूक प्रक्रिया, जनगणना, आपत्ती व्यवस्थापन तसेच शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी यांसारख्या महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडतो. मात्र, अलीकडील काळात ग्राम सभांमध्ये वादविवाद, शिवीगाळ, धमकी, धक्काबुक्की व मारहाणीचे प्रकार वाढत असल्याचा दावा संघटनेने केला आहे.

काही ठिकाणी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध तथ्यहीन तक्रारी करून अनावश्यक प्रशासकीय व सामाजिक दबाव निर्माण केला जात असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले. सोशल मीडियावर ग्रामपंचायतींबाबत शहानिशा न करता चुकीचे व्हिडिओ प्रसारित केल्याने संस्थेची प्रतिमा मलिन होत असल्याची खंत संघटनेने व्यक्त केली. (पान ४ वर)

# स्व. बाळासाहेब विखेंनी पाहिलेले स्वप्न नातवाच्या प्रयत्नातून साकार!

## साकळाईच्या कामाचा अखेर श्रीगणेशा

### ३२ गावांतील १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार; ९६७ कोटींच्या कामाचे टेंडर प्रसिद्ध : डॉ. सुजय विखे



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नगर तालुका (शशिकांत पवार)** : नगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील दुष्काळी भागासाठी वरदान ठरणाऱ्या साकळाई उपसा सिंचन योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीला अखेर निर्णायक गती मिळाली आहे. अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांच्या मनात जिवंत असलेले स्वर्गीय पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांचे साकळाईचे स्वप्न आता त्यांचे नातू तथा माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे प्रत्यक्षात येण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. योजनेच्या ९६७ कोटी रुपयांच्या कामाचे टेंडर प्रसिद्ध झाले असून पुढील दोन ते तीन महिन्यांत निविदा प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे. सर्व प्रक्रिया वेळेत पूर्ण झाल्यास दिवाळीच्या मुहूर्तावर प्रत्यक्ष कामाचा श्रीगणेशा होण्याची शक्यता डॉ. सुजय विखे यांनी व्यक्त केली.

अहिल्यानगर आणि श्रीगोंदा तालुक्यातील ३२ जिरायती गावांमधील सुमारे १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे पावसाच्या भरवशावर असलेल्या शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाचा आधार मिळून शेतीच्या उत्पादनक्षमतेत मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे.

जिरायती भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात पाण्याच्या माध्यमातून परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने स्व. बाळासाहेब विखे पाटील यांनी साकळाई योजनेची मुहूर्तमेढ रोवली होती. मात्र अनेक वर्षे विविध प्रशासकीय, तांत्रिक आणि निधीविषयक अडचणींमुळे योजना रखडली. प्रत्येक निवडणुकीत साकळाईचा विषय चर्चेत येत होता. मात्र प्रत्यक्ष (पान ४ वर)

#### ३२ गावांतील शेतकऱ्यांना थेट लाभ !

साकळाई योजनेचा लाभ चिखली, कोरेगाव, घोसपुरी, सारोळा कासार, खडकी, जाधववाडी, वाळकी, शिरढोण, हिवरे झरे, बाबुर्डी बेंड, दहिगाव, साकत, वाटेफळ, देऊळगाव सिद्धी, तांदळी, बडगाव, रुई छत्तीसी, आंबिलवाडी, गुणवडी, गुंडेगाव, राळेगण, मांडवगण, मठ पिंप्री, हातवळण, खांडगाव, महांडूळवाडी, कोळगाव, सुरेगाव, घुटेवाडी, कोतुळ, बांगर्डा आणि कामठी या ३२ गावांना अपेक्षित आहे.

# श्रीक्षेत्र वडगाव दर्यात सिंहासनाच्या जीर्णोद्धारात सापडली प्राचीन दगडी मूर्ती

### उलगडले हजारो वर्षाचे गुढ..

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पारनेर तालुका/ दत्ता गाडगे** : तालुक्यातील श्रीक्षेत्र वडगाव दर्या येथील प्रसिद्ध श्री दर्याबाई देवीच्या सिंहासनाच्या जीर्णोद्धाराचे काम सुरू असताना काळ्या पाषाणातील प्राचीन दगडी मूर्ती आढळून आल्याने परिसरात एकच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सिंहासनाच्या कामादरम्यान देवीचा सध्याचा तांदळा हलल्यानंतर ग्रामस्थांनी परिसरात काळजीपूर्वक शोध घेतला. त्यावेळी जमिनीखाली ही मूर्ती आढळून आली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, श्री दर्याबाई देवीच्या सिंहासनाच्या काम सुरू असताना आढळून आलेल्या काळ्या पाषाणातील प्राचीन दगडी मूर्तीवर लाल चुना व शेंदूर लावलेला होता. ग्रामस्थांनी तो थर काढून मूर्ती स्वच्छ केल्यानंतर तिचे स्वरूप स्पष्ट झाले. मूर्ती पद्मासनात असून मस्तकावर अर्धचंद्रासारखी रचना, चेहरा, कान, डोळे, नाक तसेच हातातील बांगड्यांची रचना दिसून येत असल्याचे ग्रामस्थ सांगतात. मूर्तीच्या शेजारी बालरूपातील आकृतीही आढळल्याचे सांगण्यात येत आहे. ती परशुराम असावी असा अंदाज व्यक्त होत आहे.मूर्ती काही प्रमाणात भग्न अवस्थेत असल्याचेही दिसून आले.

#### ग्रामसभेत होणार निर्णय

सापडलेली प्राचीन मूर्तीच कायमस्वरूपी ठेवायची की तिच्या स्वरूपाची नवीन मूर्ती तयार करायची, याबाबत ग्रामसभा घेऊन ग्रामस्थ व भाविकांच्या मताने निर्णय घेतला जाणार आहे. दरम्यान भाविकाभक्त आणि ग्रामस्थांच्या वतीने या ठिकाणी तीन दिवसीय नवचंडी यज्ञ करण्यात आला. भाविक भक्तानी मात्र या ठिकाणी देवीच्या दर्शनासाठी गर्दी वाढवली आहे.

ही मूर्ती हजारो वर्षे पुरातन असल्याचा स्थानिकांचा अंदाज असून, तिचे नेमके प्राचीनत्व, कालखंड, स्वरूप व ऐतिहासिक महत्त्व तज्ज्ञांच्या अभ्यासानंतरच स्पष्ट होणार आहे. मूर्ती सापडल्याची बातमी परिसरात पसरताच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी करण्यास सुरुवात केली. त्यामुळे वडगाव दर्या परिसरात उत्साहाचे भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

दर्याबाई-वेल्हाबाई देवस्थान हे नैसर्गिक गुहा, जागृत पाणी आणि जगप्रसिद्ध लवणस्तंभांमुळे श्रद्धा व निसर्गाचा अनोखा संगम मानले जाते. दर्याबाई देवीला वणीच्या सप्तशृंगी देवीचे अर्धपीठ, तर वेल्हाबाईला माहूरच्या रेणुका देवीचे पूर्णपीठ मानले जाते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. त्यामुळे या नव्या शोधामुळे देवस्थानाच्या प्राचीन इतिहासाबाबत कुतूहल वाढले आहे.



श्रीक्षेत्र वडगाव दर्या येथे सिंहासन जीर्णोद्धार मध्ये सापडलेली स्वयंभू मूर्ती आणि पूर्वीचा तांदळा दिसत आहे. छाया : दत्ता गाडगे